L. A. BILL No. LXXIII OF 2025.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA GOODS AND SERVICES TAX ACT, 2017.

सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७३ .

महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.

(विधानसभेने दिनांक ८ जुलै, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)

२०१७ चा महा. ४३.

ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

(२) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्या खेरीज, हे कलम, तात्काळ प्रभावाने अंमलात येईल, आणि उर्वरित कलमे, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास, भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने अंमलात येतील आणि या अधिनियमाच्या विविध तरतुदींसाठी

वेगवेगळे दिनांक नेमून देण्यात येतील आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या अशा कोणत्याही तरतुदींमधील कोणत्याही संदर्भाचा, ती तरतूद अंमलात आल्याचा संदर्भ असल्याप्रमाणे अन्वयार्थ लावण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम २ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मध्ये,- २०१७ चा महा. ४३.

(एक) खंड (६१) मधील, "कलम ९ च्या पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) अन्वये" या मजकुराऐवजी, "या अधिनियमाच्या कलम ९ च्या पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) अन्वये अथवा एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) या अन्वये" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो, १ एप्रिल, २०२५ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल;

(दोन) खंड (६९) मधील,-

(क) उप-खंड (ग) मध्ये, "राज्य शासनाकडून, नगरपालिका" या मजकुरानंतर, "निधीच्या" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) उप-खंड (ग) नंतर, पुढील स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात येईल :-

"**स्पष्टीकरण.—** या उप-खंडाच्या प्रयोजनांसाठी,—

(क) "स्थानिक निधी" याचा अर्थ, पंचायत क्षेत्राच्या संबंधातील नागरी कार्ये पार पाडण्यासाठी स्थापन केलेल्या आणि कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारा, कोणताही कर, शुल्क, पथकर, उपकर किंवा फी बसविण्याच्या, गोळा करण्याच्या आणि त्याचे विनियोजन करण्याच्या अधिकारांसह कायद्याद्वारे निहित केलेले अधिकार असलेल्या, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील किंवा व्यवस्थापनाखालील कोणताही निधी, असा आहे ;

(ख) "नगरपालिका निधी" याचा अर्थ, महानगर क्षेत्राच्या किंवा नगरपालिका क्षेत्राच्या संबंधातील नागरी कार्ये पार पाडण्यासाठी स्थापन केलेल्या आणि कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारा, कोणताही कर, शुल्क, पथकर, उपकर किंवा फी बसविण्याच्या, गोळा करण्याच्या आणि त्याचे विनियोजन करण्याच्या अधिकारांसह कायद्याद्वारे निहित केलेले अधिकार असलेल्या, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील किंवा व्यवस्थापनाखालील कोणताही निधी, असा आहे ;";

(तीन) खंड (११६) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(११६क) "विशिष्ट ओळख चिन्हांकन" याचा अर्थ, कलम १४८क च्या पोट-कलम (२) च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेले विशिष्ट ओळख चिन्हांकन, असा आहे आणि त्यात, जी विशिष्ट आहे, सुरक्षित आहे व न काढता येण्यासारखी आहे अशी डिजिटल मुद्रा, डिजिटल खूण किंवा अन्य कोणतेही तत्सम चिन्हांकन यांचा समावेश होतो;".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १२ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम १२ मधील, पोट-कलम (४) वगळण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १३ ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मधील, पोट-कलम (४) वगळण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १७ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम १७ मध्ये, पोट-कलम (५) मधील, खंड (घ) मध्ये,-

(एक) "संयंत्रे किंवा यंत्रसामग्री" या मजकुराऐवजी, "संयंत्र व यंत्रसामग्री" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि तो, १ जुलै, २०१७ पासून दाखल करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल;

(दोन) स्पष्टीकरणास, त्याचे स्पष्टीकरण १ असा नवीन क्रमांक देण्यात येईल, आणि असा नवीन क्रमांक देण्यात आलेल्या स्पष्टीकरण १ नंतर, पुढील स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात येईल :-

"**स्पष्टीकरण २.–** खंड (घ) च्या प्रयोजनांसाठी, याद्वारे असे स्पष्ट करण्यात येते की, कोणत्याही न्यायालयाच्या, न्यायाधिकरणाच्या किंवा अन्य प्राधिकरणाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, 'संयंत्र किंवा यंत्रसामग्री' याच्या कोणत्याही संदर्भाचा, 'संयंत्र व यंत्रसामग्री' यांचा संदर्भ असल्याप्रमाणे अन्वयार्थ लावण्यात येईल आणि नेहमीकरिता अन्वयार्थ लावण्यात आला असल्याचे मानण्यात येईल ;".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम २० ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम २० मध्ये, १ एप्रिल, २०२५ पासून,-

(एक) पोट-कलम (१) मधील, "कलम ९ च्या पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) अन्वये" या मजकुराऐवजी, "या अधिनियमाच्या कलम ९ च्या पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) अन्वये अथवा एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) अन्वये," हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) पोट-कलम (२) मधील, "कलम ९ च्या पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) खालील " या मजकुराऐवजी, "या अधिनियमाच्या कलम ९ च्या पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) अन्वये अथवा एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) अन्वये," हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३४ ची सुधारणा.

७. मुख्य अधिनियमाच्या कलम ३४ मध्ये, पोट-कलम (२) मधील परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :–

"परंतु, जर,–

(एक) अशा जमापत्राशी संबंधित असलेली निविष्टी कराची जमा रक्कम, घेतलेली असल्यास,जेव्हा प्राप्तकर्ता हा नोंदणीकृत व्यक्ती असेल त्या बाबतीत, अशा प्राप्तकर्त्याकडून परत करण्यात आलेली नसेल ; किंवा

(दोन) अशा पुरवठ्यावरील कराचा भार, अन्य प्रकरणी, अन्य कोणत्याही व्यक्तीवर टाकण्यात आला असेल,

तर, पुरवठादाराच्या उद्दिष्टी कर दायित्वामध्ये कपात करण्यास परवानगी असणार नाही.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३८ ची सुधारणा.

८. मुख्य अधिनियमाच्या कलम ३८ मध्ये,-

(एक) पोट-कलम (१) मधील, "स्वयं-निर्मित विवरणपत्र" या मजकुराऐवजी, "विवरणपत्र" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) पोट-कलम (२) मधील,-

(क) "खालील स्वयं-निर्मित विवरणपत्रात" या मजकुराऐवजी, "मध्ये निर्दिष्ट केलेल्या विवरणपत्रात" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (क) मधील, "आणि" हा मजकूर वगळण्यात येईल;

(ग) खंड (ख) मधील, "उक्त पुरवठ्यांच्या तपशिलांच्या बाबतीत" या मजकुरानंतर, "असेल त्यासह" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(घ) खंड (ख) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :–

"(ग) विहित करण्यात येतील असे इतर तपशील.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ३९ ची सुधारणा.

९. मुख्य अधिनियमाच्या कलम ३९ मध्ये, पोट-कलम (१) मधील, "विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने व मुदतीत" या मजकुराऐवजी, "विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने व मुदतीत आणि अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम १०७ ची सुधारणा.

१०. मुख्य अधिनियमाच्या कलम १०७ मध्ये, पोट-कलम (६) मधील, परंतुकाऐवजी, पुढील परंतुक दाखल करण्यात येईल :–

"परंतु, कोणत्याही कराच्या मागणीचा अंतर्भाव न करता, शास्तीची मागणी करणाऱ्या कोणत्याही आदेशाच्या बाबतीत, अपीलकर्त्याकडून उक्त शास्तीच्या दहा टक्के इतकी रक्कम प्रदान करण्यात आल्याशिवाय, अशा आदेशाविरुद्ध कोणतेही अपील दाखल करण्यात येणार नाही.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम ११२ ची सुधारणा.

११. मुख्य अधिनियमाच्या कलम ११२ मधील, पोट-कलम (८) मध्ये, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

" परंतु, कोणत्याही कराच्या मागणीचा अंतर्भाव न करता, शास्तीची मागणी करणाऱ्या कोणत्याही आदेशाच्या बाबतीत, अपीलकर्त्याकडून कलम १०७ च्या पोट-कलम (६) च्या परंतुकान्वये प्रदेय असलेल्या रकमेव्यतिरिक्त, उक्त शास्तीच्या दहा टक्के इतकी रक्कम प्रदान करण्यात आल्याशिवाय, अशा आदेशाविरुद्ध कोणतेही अपील दाखल करण्यात येणार नाही.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ मध्ये नवीन कलम १२२ख समाविष्ट करणे.

१२. मुख्य अधिनियमाच्या कलम १२२क नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

मागोवा व शोध घेणाऱ्या यंत्रणेचे अनुपालन करण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.

" **१२२ख.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा कलम १४८क च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेली कोणतीही व्यक्ती, उक्त कलमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून कृती करीत असेल तर, ती व्यक्ती, प्रकरण पंधरा किंवा या प्रकरणाच्या तरतुदी या खालील कोणत्याही शास्तीव्यतिरिक्त, एक लाख रुपये इतक्या किंवा अशा वस्तूंवर प्रदेय असलेल्या कराच्या दहा टक्के इतक्या, यांपैकी जी अधिक असेल तितक्या रकमेइतकी शास्ती प्रदान करण्यास पात्र असेल.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ मध्ये नवीन कलम १४८क समाविष्ट करणे.

१३. मुख्य अधिनियमाच्या कलम १४८ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

विवक्षित वस्तूंचा मागोवा व शोध घेणारी यंत्रणा.

" **१४८क.** (१) शासनास, ज्यांना या कलमाच्या तरतुदी लागू असतील अशा,—

(क) वस्तू ;

(ख) ज्यांच्या कब्जात अशा वस्तू आहेत किंवा जे त्यांचा व्यवहार करतात अशा व्यक्ती किंवा व्यक्तींचा वर्ग,

परिषदेच्या शिफारशींवरून, अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करता येतील.

(२) शासनास, पोट-कलम (१) च्या खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या वस्तूंच्या बाबतीत,—

(क) विहित करण्यात येईल अशा व्यक्तींमार्फत, विशिष्ट ओळख चिन्हांकन करणे आणि इलेक्ट्रॉनिक माहिती साठविणे आणि त्यामध्ये अंतर्भूत असलेली माहिती मिळविणे शक्य व्हावे यासाठी एका प्रणालीची तरतूद करता येईल ; आणि

(ख) अशा वस्तूंसाठी, त्यात नोंदवावयाच्या माहितीसह, विशिष्ट ओळख चिन्हांकन विहित करता येईल.

(३) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्ती,—

(क) उक्त वस्तूंवर किंवा त्यांच्या पुडक्यांवर, विहित करण्यात येईल अशी माहिती अंतर्भूत असलेले व अशा रीतीने एक विशिष्ट ओळख चिन्हांकन करणे ;

(ख) विहित करण्यात येईल अशा वेळेच्या आत अशी माहिती व तपशील सादर करील आणि विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने असा अभिलेख किंवा दस्तऐवज ठेवील ;

(ग) अशा वस्तूंच्या निर्मात्याच्या व्यवसायाच्या ठिकाणी बसविलेल्या यंत्रसामग्रीची ओळख, क्षमता, कार्यान्वयानाचा कालावधी यांसह तिचा तपशील आणि विहित करण्यात येईल असे इतर तपशील किंवा माहिती, विहित करण्यात येईल अशा मुदतीत अशा नमुन्यात व रीतीने सादर करील ;

(घ) पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रणालीच्या संबंधात विहित करण्यात येईल अशी रक्कम प्रदान करील.".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या अनुसूची तीनची सुधारणा.

१४. मुख्य अधिनियमाच्या अनुसूची तीनमध्ये,—

(एक) परिच्छेद ८ मधील, खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल आणि तो, १ जुलै, २०१७ पासून समाविष्ट करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल :—

" (कक) निर्यातीकरिता वटवणी करण्यापूर्वी कोणत्याही व्यक्तीला किंवा देशांतर्गत प्रशुल्क क्षेत्राकरिता विशेष आर्थिक क्षेत्रातील किंवा मुक्त व्यापार वखार क्षेत्रातील वखारीमध्ये साठवलेल्या वस्तूंचा केला जाणारा पुरवठा ;";

(दोन) स्पष्टीकरण २ मधील, " परिच्छेद ८ च्या" या मजकुरानंतर, "खंड (क) च्या " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल आणि तो, १ जुलै, २०१७ पासून समाविष्ट करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल ;

(तीन) स्पष्टीकरण २ नंतर, पुढील स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात येईल आणि ते, १ जुलै, २०१७ पासून समाविष्ट करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

" **स्पष्टीकरण ३**.—परिच्छेद ८ च्या खंड (कक) च्या प्रयोजनांसाठी, " विशेष आर्थिक क्षेत्र ", "मुक्त व्यापार व खार क्षेत्र" आणि " देशांतर्गत प्रशुल्क क्षेत्र " या शब्दप्रयोगांना, विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ याच्या कलम २ मध्ये अनुक्रमे जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.". २००५ चा २८.

वसूल केलेल्या कराचा परतावा न करणे.

१५. जो गोळा करण्यात आला आहे, परंतु सर्व महत्त्वाच्या वेळी कलम १४ अंमलात असते तर, जो अशा प्रकारे गोळा करता आला नसता, अशा सर्व कराचा परतावा दिला जाणार नाही.

उद्देश व कारणे यांचे निवेदन

वस्तू व सेवा कर परिषदेने, तिच्या बैठकीमध्ये, वस्तू व सेवा कर कायद्यांमध्ये सुधारणा करण्यास सुचविणारे विविध निर्णय घेतलेले आहेत. त्यानुसार, संसदेकडून वित्त अधिनियम, २०२५ (२०२५ चा ७) याद्वारे, केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (२०१७ चा १२) यामध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. वस्तू व सेवा कर परिषदेने, उपरोक्त बैठकांमध्ये घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याच्या आणि केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ आणि महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ४३) यांच्या तरतुदींच्या प्रयोज्यतेमध्ये एकरूपता राखण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात सुधारणा करणे इष्ट आहे.

२. प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

(एक) एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ याच्या कलम ५ ची पोट-कलमे (३) व (४) या अन्वये कराच्या अधीन असलेल्या पुरवठ्यांचा संदर्भ समाविष्ट करून त्याद्वारे, निविष्टी सेवा वितरक (आय एस डी) यंत्रणेअंतर्गत आंतर-राज्य प्रत्यावर्ती आकार यंत्रणा (आर सी एम) व्यवहारांचा स्पष्टपणे समावेश करण्यासाठी, कलम २ च्या खंड (६१) मध्ये सुधारणा करणे;

(दोन) 'स्थानिक निधी' व 'नगरपालिका निधी' या संज्ञांच्या व्याख्यांसाठी तरतूद करण्याकरिता स्पष्टीकरण समाविष्ट करण्यासाठी, कलम २ च्या खंड (६९) च्या उप-खंड (ग) मध्ये सुधारणा करणे;

(तीन) मागोवा व शोध घेणाऱ्या यंत्रणेची अंमलबजावणी करण्यासाठी विशिष्ट ओळख चिन्हांकन याच्या व्याख्येची तरतूद करण्यासाठी, कलम २ मध्ये नवीन खंड (११६क) समाविष्ट करणे;

(चार) प्रमाणकांचा व्यवहार हा, वस्तूंचा पुरवठा किंवा सेवांचा पुरवठा नसल्यामुळे प्रमाणकांच्या व्यवहारांच्या बाबतीतील पुरवठ्याच्या वेळेची तरतूद काढून टाकण्यासाठी, कलम १२ चे पोट-कलम (४) आणि कलम १३ चे पोट-कलम (४) वगळणे;

(पाच) कलम १७ च्या पोट-कलम (५) च्या खंड (घ) मध्ये, १ जुलै, २०१७ पासून भूतलक्षी प्रभावाने सुधारणा करणे;

(सहा) एकात्मिक वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ याच्या कलम ५ ची पोट-कलमे (३) व (४) या अन्वये करपात्र असलेल्या पुरवठ्यांचा निर्देश करून त्याद्वारे, निविष्टी सेवा वितरक (आय एस डी) यंत्रणेअंतर्गत आंतर-राज्य प्रत्यावर्ती आकार यंत्रणा (आर सी एम) व्यवहारांचा सुस्पष्टपणे समावेश करण्यासाठी, कलम २० ची पोट-कलमे (१) व (२) यांमध्ये सुधारणा करणे;

(सात) नोंदणीकृत प्राप्तकर्त्याने, जमापत्राच्या बाबतीत पुरवठादाराच्या कर दायित्वात कपात करण्याच्या प्रयोजनासाठी उक्त जमापत्राच्या बाबतीत तत्सम निविष्टी कराची जमा रक्कम, घेतलेली असल्यास, नोंदणीकृत प्राप्तकर्त्याने ती परत करण्याच्या आवश्यकतेची स्पष्टपणे तरतूद करण्यासाठी, कलम ३४ च्या पोट-कलम (२) मध्ये सुधारणा करणे. उक्त जमा पत्राच्या बाबतीत, पुरवठादाराचे कर दायित्व कमी करण्याच्या प्रयोजनासाठी पुरवठ्यावरील व्याजाचा भार दुसऱ्यावर न टाकण्याची उक्त परंतुकातील अट वगळण्याचा हेतू देखील आहे ;

(आठ) निविष्टी कराच्या जमा रकमेच्या विवरणपत्राच्या संबंधातील, "स्वयंनिर्मित" ही संज्ञा काढून टाकण्यासाठी, कलम ३८ च्या पोट-कलम (१) व (२) यामध्ये सुधारणा करणे ;

(नऊ) उक्त पोट-कलमान्वये विवरण दाखल करण्याच्या शर्ती व निर्बंध विहित करण्याकरिता समर्थकारी खंडाची तरतूद करता यावी म्हणून कलम ३९ च्या पोट-कलम (१) ची सुधारणा करणे ;

(दहा) कराच्या मागणीचा अंतर्भाव न करता केवळ शास्तीची मागणी अंतर्भूत असलेल्या प्रकरणांमध्ये, अपील प्राधिकाऱ्यासमोर अपील दाखल करण्यासाठी, आधीच जमा करावयाच्या पंचवीस टक्के इतक्या रकमेऐवजी, दहा टक्के इतकी रक्कम प्रदान करण्याची तरतूद करण्यासाठी, कलम १०७ च्या पोट-कलम (६) च्या परंतुकात सुधारणा करणे;

(अकरा) कराची मागणी न करता केवळ शास्तीची मागणी अंतर्भूत असलेल्या प्रकरणांमध्ये अपील न्यायाधिकरणासमोर अपील दाखल करण्यासाठी, आधीच जमा करावयाच्या शास्तीच्या दहा टक्के इतकी रक्कम प्रदान करण्याची तरतूद करण्यासाठी, कलम ११२ च्या पोट-कलम (८) मध्ये नवीन परंतुक समाविष्ट करणे ;

(बारा) कलम १४८क अन्वये, तरतूद केलेल्या मागोवा व शोध घेणाऱ्या यंत्रणेशी संबंधित असलेल्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल शास्तीची तरतूद करण्यासाठी, कलम १२२ख समाविष्ट करणे ;

(तेरा) विनिर्दिष्ट केलेला कर चुकविण्याकडे कल असलेल्या विक्रेय वस्तूंसाठी मागोवा व शोध घेणाऱ्या यंत्रणेची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाला अधिकार प्रदान करण्याकरिता समर्थकारी तरतूद करता यावी म्हणून कलम १४८क समाविष्ट करणे ;

(चौदा) (क) अनुसूची तीनच्या परिच्छेद ८ मध्ये, नवीन खंड (कक) समाविष्ट करून त्याद्वारे, निर्यातीसाठी वटवणी देण्यापूर्वी कोणत्याही व्यक्तीला किंवा देशांतर्गत प्रशुल्क क्षेत्राला विशेष आर्थिक क्षेत्रातील किंवा मुक्त व्यापार वखार क्षेत्रातील वखारीत साठविलेल्या वस्तूंचा केला जाणारा पुरवठा हा, वस्तूंचा पुरवठा किंवा सेवांचा पुरवठा म्हणून मानला जाणार नाही अशी तरतूद करण्यासाठी;

(ख) उक्त अनुसूचीच्या परिच्छेद ८ च्या खंड (क) च्या बाबतीत उक्त स्पष्टीकरण लागू होईल हे सुस्पष्ट करण्यासाठी, स्पष्टीकरण २ मध्ये सुधारणा करण्यासाठी;

(ग) उक्त अनुसूचीच्या, परिच्छेद ८ मध्ये, प्रस्तावित केलेल्या खंड (कक) च्या प्रयोजनार्थ, 'विशेष आर्थिक क्षेत्र', 'मुक्त व्यापार वखार क्षेत्र' आणि 'देशांतर्गत प्रशुल्क क्षेत्र' या संज्ञांची व्याख्या करण्यासाठी स्पष्टीकरण ३ जादा दाखल करण्यासाठी,

अनुसूची तीनमध्ये १ जुलै, २०१७ पासून भूतलक्षी प्रभावाने सुधारणा करणे.

३. वरील उद्दिष्टे साध्य करणे, हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **अजित पवार,**

दिनांक २ जुलै, २०२५. उप मुख्यमंत्री (वित्त).

वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

खंड १(२).– या खंडान्वये, या अधिनियमाची उर्वरित कलमे, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने अंमलात आणण्याचा आणि या अधिनियमाच्या विविध तरतुदींसाठी वेगवेगळे दिनांक नियत करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

खंड १३.– उक्त अधिनियमात, कलम १४८क समाविष्ट करण्याचा हेतू असणाऱ्या या खंडान्वये,—

(एक) उप-खंड (१) मध्ये, वस्तूंसाठी किंवा व्यक्तींसाठी या कलमाची प्रयोज्यता अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करण्याचा अधिकार ;

(दोन) उप-खंड (२) मध्ये, विहित करण्यात येईल अशा व्यक्तींमार्फत, विशिष्ट ओळख चिन्हांकन करणे आणि इलेक्ट्रॉनिक माहिती साठविणे आणि त्यामध्ये अंतर्भूत असलेली माहिती मिळविणे, शक्य व्हावे यासाठी एक प्रणाली विहित करण्याचा अधिकार;

(तीन) उप-खंड (३) मध्ये,-

(क) वस्तूंवर किंवा पुडक्यांवर विशिष्ट ओळख चिन्हांकन करण्याची माहिती व रीत;

(ख) विहित करण्यात येईल अशा मुदतीत, माहिती व तपशील सादर करण्याचा नमुना व रीत;

(ग) व्यवसायाच्या ठिकाणी बसविलेल्या यंत्रसामग्रीचा तपशील आणि विहित करण्यात येईल असा इतर तपशील किंवा माहिती सादर करण्याचा नमुना व रीत;

(घ) विशिष्ट ओळख चिन्हांकन करणे शक्य व्हावे यासाठी प्रणालीच्या संबंधात प्रदान करावयाची रक्कम,

विहित करण्याचा अधिकार,

राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचे आहेत.

वित्तीय ज्ञापन

वस्तू व सेवा कर परिषदेने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याच्या आणि केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ आणि महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ४३) यांच्या तरतुदींच्या प्रयोज्यतेमध्ये एकरुपता राखण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ४३) याच्या विविध कलमांमध्ये विवक्षित सुधारणा केलेल्या आहेत.

हे विधेयक, राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर, राज्याच्या एकत्रित निधीतून करावयाच्या आवर्ती किंवा अनावर्ती खर्चाचा अंतर्भाव होईल अशी कोणतीही तरतूद, या विधेयकात नाही.

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस

(महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (१) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२५ पुरःस्थापनार्थ घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस करीत आहेत.

(शा.म.मु.) एचबी ०८००–३ (४४५–७-२०२५)

सन २०२५ चे वि.स. वि. क्र. ७३-महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२५ याचे परिशिष्ट

(महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यातील उतारे)

(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम ४३)

१. ** ** **

२. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,- व्याख्या.

(१) ते (६०) ** ** **

"(६१) "निविष्टी सेवा वितरक (इनपुट सर्व्हिस डिस्ट्रीब्युटर)" याचा अर्थ, जो, कलम २५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या भिन्न व्यक्तींकरिता किंवा त्याच्या वतीने, कलम ९ च्या पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) अन्वये कर पात्र असलेल्या सेवांच्या बाबतीतील बीजकांसह निविष्टी सेवा मिळाल्याच्या संबंधात कर बीजके स्वीकारतो, आणि कलम २० मध्ये तरतूद केलेल्या रीतीने अशा बीजकांच्या बाबतीतील निविष्टी कराची जमा रक्कम वितरित करण्यास पात्र आहे असा, वस्तूंचा किंवा सेवांचा, अथवा दोन्हींचा पुरवठा करणाऱ्या पुरवठादाराचे कार्यालय, असा आहे ; ".

(६२) ते (६८) ** ** **

(६९) "स्थानिक प्राधिकरण" याचा अर्थ,-

(क) व (ख) ** ** **

(ग) केंद्र सरकारकडून किंवा कोणत्याही राज्य शासनाकडून, नगरपालिका किंवा स्थानिक निधीच्या नियंत्रणाचे किंवा व्यवस्थापनाचे कायदेशीर हक्क प्रदान करण्यात आलेली नगरपालिका समिती, जिल्हा परिषद, जिल्हा मंडळ आणि इतर कोणतेही प्राधिकरण ;

(घ) व (छ) ** ** **

(७०) ते (१२०) ** ** **

३. ते **११.** ** ** **

१२. (१) ते (३) ** ** ** वस्तूंच्या पुरवठ्याची वेळ.

(४) पुरवठादाराने प्रमाणकाचा पुरवठा करण्याच्या प्रकरणात, पुरवठ्याची वेळ ही,–

(क) जर त्यावेळी पुरवठा निश्चित होणार असेल तर, प्रमाणक दिल्याचा दिनांक हा असेल; किंवा—

(ख) इतर सर्व प्रकरणांत, प्रमाणक सोडवणूक (redemption) दिनांक, हा असेल.

(५) व (६) ** ** **

१३. (१) ते (३) ** ** ** सेवेच्या पुरवठ्याची वेळ.

(४) पुरवठादाराने प्रमाणकाचा पुरवठा करण्याच्या प्रकरणात, पुरवठ्याची वेळ ही,—

(क) जर त्यावेळी पुरवठा निश्चित होणार असेल तर, प्रमाणक दिल्याचा दिनांक, हा असेल;

(ख) इतर सर्व प्रकरणांत, प्रमाणक सोडवणूक (redemption) दिनांक, हा असेल.

(५) व (६) ** ** **

१४. ते **१६.** ** ** **

१७. (१) ते (४) ** ** **

जमा रक्कम व रोखलेली जमा रक्कम यांचे संविभाजन.

(५) कलम १६ च्या पोट-कलम (१) मध्ये व कलम १८ च्या पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, निविष्टी कर जमा पुढील बाबतीत उपलब्ध असणार नाहीत :—

(क) ते (ग) ** ** **

(घ) संयंत्रे व यंत्रसामग्री यांहून अन्य स्थावर मालमत्तेच्या बांधकामासाठी स्वतःकरिता, प्राप्त केलेल्या वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही ; करपात्र व्यक्तीने जेव्हा अशा वस्तू किंवा सेवा किंवा दोन्ही धंद्याच्या ओघात किंवा धंद्याच्या अभिवृद्धीसाठी वापरल्या असतील त्यासह ;

स्पष्टीकरण.– खंड (ग) व (घ) च्या प्रयोजनार्थ " बांधकाम " या शब्दप्रयोगामध्ये, भांडवलीकरणाच्या मर्यादेपर्यंत उक्त स्थावर मालमत्तेचे पुनर्बांधकाम, नूतनीकरण, अतिरिक्त बांधकाम, किंवा फेरफार किंवा दुरुस्ती, याचा समावेश होतो ;

(ड.) ते (झ) ** ** **

(६) ** ** **

१८. व **१९.** ** ** **

निविष्ट सेवा वितरकाने जमा रकमेचे वितरण करण्याची रीत.

२०. (१) जो, कलम २५ मध्ये निर्दिष्ट केलेल्या भिन्न व्यक्तींसाठी किंवा त्यांच्या वतीने, कलम ९ च्या पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) अन्वये करपात्र असलेल्या सेवांच्या बाबतीतील बीजकांसह, निविष्टी सेवा मिळाल्याच्या बाबतीत कर बीजक स्वीकारतो अशा वस्तूंच्या किंवा सेवांच्या अथवा दोन्हींच्या पुरवठादाराच्या कोणत्याही कार्यालयाची, कलम २४ च्या खंड (आठ) अन्वये निविष्टी सेवा वितरक म्हणून नोंदणी करणे आवश्यक असेल आणि ते, अशा बीजकांच्या बाबतीत निविष्टी कराची जमा रक्कम वितरित करील.

(२) निविष्टी सेवा वितरक, उक्त निविष्टी सेवा वितरक म्हणून, त्याच राज्यात नोंदणी केलेल्या भिन्न व्यक्तीने प्रदान केलेल्या कलम ९ च्या पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) खालील कर आकारणीच्या अधीन असलेल्या सेवांच्या बाबतीत, राज्य किंवा एकात्मिक कराच्या जमा रकमांसह, त्याने स्वीकारलेल्या बीजकांवर आकारलेल्या राज्य कराच्या किंवा एकात्मिक कराच्या जमा रकमेचे, विहित करण्यात येईल अशा रीतीने, अशा मुदतीत आणि अशा निर्बंधांच्या व शर्तींच्या अधीन राहून, वितरण करील.

(३) ** ** **

२१. व **३३.** ** ** **

जमापत्र आणि नावेपत्र.

३४. (१) ** ** **

(२) वस्तू किंवा सेवा किंवा दोन्हींच्या पुरवठ्याच्या बाबतीत जी व्यक्ती जमापत्र देते अशी कोणतीही नोंदणीकृत व्यक्ती, ज्या महिन्यात असे जमापत्र देण्यात आले असेल त्या महिन्याच्या विवरणामध्ये अशा जमापत्राचे तपशील घोषित करील, परंतु ज्या वित्तीय वर्षामध्ये असा पुरवठा करण्यात आला होता त्या वित्तीय वर्षाच्या समाप्तीनंतरच्या तीस नोव्हेंबरच्या आत किंवा प्रस्तुत वार्षिक विवरण दाखल करण्याच्या दिनांकास, यांपैकी जे अगोदर घडेल त्यानंतर अशा जमापत्राचे तपशील त्याला घोषित करता येणार नाहीत आणि विहित करण्यात येईल अशारीतीने कर दायित्व समायोजित करण्यात येईल :

परंतु, जर अशा पुरवठ्यावरील कर व व्याज यांचा भार अन्य कोणत्याही व्यक्तीवर टाकला गेला असेल तर पुरवठादाराच्या उद्विष्टी करदायित्वामध्ये कपात करण्यास परवानगी असणार नाही.

(३) व (४) ** ** **

३५. ते **३७.** ** ** **

“**३८.** (१) कलम ३७ च्या पोट-कलम (१) अन्वये नोंदणीकृत व्यक्तीने सादर केलेल्या जावक पुरवठ्यांचे आणि विहित करण्यात येतील अशा इतर पुरवठ्यांचे तपशील, आणि निविष्टी कराच्या जमा रकमांचा तपशील अंतर्भूत असणारे स्वयं-निर्मित विवरणपत्र, विहित करण्यात येतील अशा नमुन्यात व अशा रीतीने, अशा मुदतीत आणि अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, अशा पुरवठ्यांच्या प्राप्तकर्त्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येतील. आवक पुरवठा व निविष्टी कर जमा रकमा यांचा तपशील कळविणे.

(२) पोट-कलम (१) खालील स्वयं-निर्मित विवरणपत्रात, पुढील तपशिलांचा समावेश असेल :—

(क) ज्याच्या बाबतीत निविष्टी कराची जमा रक्कम प्राप्तकर्त्याला प्राप्त होईल त्या आवक पुरवठ्याचे तपशील; आणि

(ख) (एक) विहित करण्यात येईल अशा नोंदणी करून घेण्याच्या कालावधीत कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीद्वारे; किंवा

(दोन) जिने कर भरण्यात कसूर केली असेल आणि जेव्हा अशी कसूर विहित करण्यात येईल अशा कालावधीसाठी चालू राहिली असेल तेव्हा, अशा कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीद्वारे; किंवा

(तीन) विहित करण्यात येईल अशा कालावधीमध्ये उक्त पोट-कलमान्वये जिने सादर केलेल्या जावक पुरवठ्यांच्या विवरणपत्रानुसार, जिच्याकडून प्रदेय असलेला उद्दिष्टी कर, विहित करण्यात येईल अशा मुदतीच्या उक्त कालावधीमध्ये, तिने प्रदान केलेल्या उद्दिष्टी करापेक्षा अधिक असेल अशा कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीद्वारे; किंवा

(चार) जिने विहित करण्यात येईल अशा मुदतीत खंड (क) नुसार तिला निविष्टी कराची जी रक्कम प्राप्त होऊ शकली असती त्या जमा रकमेऐवजी विहित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक रकमेचा दावा केलेला असेल अशा कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीद्वारे; किंवा

(पाच) जिने विहित करण्यात येतील अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, कलम ४९ च्या पोट-कलम (१२) च्या तरतुदींनुसार तिचे कर दायित्त्व फेडण्यात कसूर केली असेल अशा कोणत्याही नोंदणीकृत व्यक्तीद्वारे; किंवा

(सहा) विहित करण्यात येईल अशा व्यक्तींच्या अन्य वर्गाद्वारे,

कलम ३७ च्या पोट-कलम (१) अन्वये सादर करण्यात येणाऱ्या उक्त पुरवठ्यांच्या तपशिलांच्या बाबतीत ज्याच्या बाबतीत अशा जमा रकमा,- मग त्या पूर्णतः असो की अंशतः असो,- प्राप्तकर्त्याला प्राप्त होऊ शकत नाहीत त्या पुरवठ्यांचे तपशील.”.

३९. “(१) निविष्टी सेवा वितरक किंवा अनिवासी करपात्र व्यक्ती किंवा कलम १० किंवा कलम ५१ किंवा कलम ५२ यांच्या तरतुदींन्वये कर प्रदान करणारी व्यक्ती यांव्यतिरिक्त, प्रत्येक नोंदणीकृत व्यक्ती, प्रत्येक कॅलेंडर महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी, वस्तुंचा किंवा सेवांचा किंवा दोन्हींचा आवक व जावक पुरवठा, लाभ घेतलेली निविष्टी कराची जमा रक्कम, प्रदेय कर, असा अन्य तपशील, यांचे विवरण विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने व मुदतीत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने दाखल करीलः विवरण दाखल करणे.

परंतु, शासनास, परिषदेच्या शिफारशीवरून, ज्या प्रत्येक तिमाहीसाठी किंवा त्याच्या भागासाठी विवरण सादर करतील अशा नोंदणीकृत व्यक्तींचा विवक्षित प्रवर्ग, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अटी व निर्बंधाच्या अधीन राहून, अधिसूचित करता येईल.

(२) ते (१०) ** ** **

४०. ते **१०६.** ** ** **

अपील प्राधिकाऱ्याकडे अपिले करणे.

१०७. (१) ते (५) ** ** **

(६) जर अपीलकर्त्याने,—

(क) त्याने कबूल केल्याप्रमाणे आक्षेपित आदेशानुसार उद्‌भवलेल्या कराच्या रकमेचा असा भाग, व्याज, दंड, शास्ती, फी यांचा पूर्णतः भरणा केला नसेल; आणि

(ख) ज्याच्यासंबंधात अपील दाखल करण्यात आले असेल त्या उक्त आदेशातून उद्‌भवलेल्या उर्वरित विवादग्रस्त कराच्या पंचवीस कोटी रुपये या कमाल रकमेस अधीन राहून, रकमेच्या दहा टक्के इतक्या रकमेचा भरणा केला नसेल तर,

पोट-कलम (१) अन्वये कोणतेही अपील दाखल करण्यात येणार नाही.

"परंतु अपीलकर्त्याने शास्तीच्या पंचवीस टक्क्यांइतकी रक्कम प्रदान केल्याशिवाय कलम १२९ च्या पोट-कलम (३) खालील आदेशाविरुद्ध अपील दाखल करता येणार नाही.".

(७) ते (१६) ** ** **

१०८. ते **१११.** ** ** **

अपील न्यायाधिकरणाकडे अपील करणे

११२. (१) ते (७)

(८) अपीलकर्त्याने,—

(क) त्या आक्षेपित आदेशातून उद्‌भवणाऱ्या रकमेच्या भागापैकी, त्याने मान्य केली असेल अशी कराची, व्याजाची, दंडाची, फीची आणि शास्तीची संपूर्ण रक्कम भरली नाही तर ; आणि

(ख) ज्याच्या संबंधात अपील दाखल करण्यात आले असेल त्या उक्त आदेशातून उद्‌भवणारी, कलम १०७ च्या पोट-कलम (६) अन्वये भरलेल्या रकमेव्यतिरिक्त विवादास्पद कराच्या पंचवीस कोटी रुपये या कमाल रकमेस अधीन राहूने, उर्वरित रकमेच्या दहा टक्के एवढी रक्कम भरली नाही तर,

पोट-कलम (१) अन्वये कोणतेही अपील दाखल करण्यात येणार नाही.

(९) व (१०) ** ** **

११३. ते **१७४.** ** ** **

अनुसूची एक व दोन ** ** **

अनुसूची तीन

[कलम ७ पहा]

वस्तूंचा पुरवठा किंवा सेवांचा पुरवठा ठरणार नाहीत असे व्यवहार किंवा संव्यवहार

१. ते **७.** ** ** **

८. (क) अंतर्देशीय वापराकरिता वटवणी देण्यापूर्वी कोणत्याही व्यक्तीला वखारीतील वस्तूंचा केला जाणारा पुरवठा;

(ख) भारताबाहेर स्थित असलेल्या मूळ बंदराहून वस्तुंची पाठवणी करण्यात आल्यानंतर परंतु, अंतर्देशीय वापराकरिता वटवणी करण्यापूर्वी, वस्तुंच्या मालकीहक्कांसंबंधीच्या दस्तऐवजाचे पृष्ठांकन करून त्याद्वारे, मालप्रेषितीकडून इतर कोणत्याही व्यक्तीला होणारा वस्तुंचा पुरवठा." ;

स्पष्टीकरण-१.– परिच्छेद २च्या प्रयोजनार्थ " न्यायालय " या संज्ञेमध्ये, जिल्हा न्यायालय, उच्च न्याय आणि सर्वोच्च न्यायालय यांचा समावेश होतो.

"**स्पष्टीकरण-२.–** परिच्छेद ८ च्या प्रयोजनांसाठी, " वखारीतील वस्तू " या शब्दप्रयोगास, सीमाशुल्क अधिनियम, १९६२ मध्ये जो अर्थ नेमून दिला असेल तोच अर्थ असेल.".

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

[सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७३.]

[महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]

[श्री. अजित पवार,
उप मुख्यमंत्री (वित्त)**]**

[विधानसभेने दिनांक ८ जुलै, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.]

जितेंद्र भोळे,
सचिव (१),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.